सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**प्राथमिक शिक्षण संचालनालय**
महाराष्ट्र राज्य
मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट रोड, पुणे ४११००१
दूरध्वनी क्र. (०२०) २६१२५८७४ ई-मेल : depmah@gmail.com

**गोविंद नांदेडे**
शिक्षण संचालक (प्राथमिक)

क्र. संकिर्ण/२०१६/ 3054
दिनांक : ०७-०६-२०१६

प्रति,
१) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व.
२) शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, सर्व.

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये जिल्हा परिषद शाळामधील शिक्षक, मुख्याध्यापक आणि विद्यार्थ्यांसाठी तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था उपक्रम राबविण्यासाठी परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :** सलाम मुंबई फाऊंडेशन यांचे दि. १ जून २०१६ चे पत्र.

उपरोक्त विषयाबाबतच्या सलाम मुंबई फाऊंडेशन या संस्थेने सन २०१६-१७ या वर्षात जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था उपक्रम राबविण्यास परवानगी मागितली आहे. तंबाखूमुक्त शाळा ही काळाची गरज आहे.

शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ मध्ये तंबाखूमुक्त शाळेसाठी त्यांनी खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

१) तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था या विषयावर महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात शिक्षणाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व गटशिक्षणाधिकारी आणि प्रत्येक ३ तज्ञ मार्गदशकांचे उद्‌बोधन करण्याबाबत विनंती केली आहे. ज्या दिवशी गटशिक्षणाधिकारी/क्षेत्रीय अधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात येते त्या दिवशी सदर बाबत शिक्षणाधिकाऱ्यांनी ग.शि.अ./क्षेत्रीय अधिकारी यांचे तंबाखूमुक्तीबाबत उद्‌बोधन करावे.

२) तालुका स्तरावर गटशिक्षणाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ३ तज्ञ मार्गदशकांच्या द्वारे सर्व शाळांचे मुख्याध्यापक तसेच केंद्रप्रमुख यांच्या मासिक बैठकीत मु.अ.चे उद्‌बोधन करावे.

३) सलाम मुंबई फाऊंडेशन या संस्थेकडून वर्षाअखेरीस याबाबत काही शाळांमधून निरीक्षण करण्यास परवानगी देण्यात यावी.

तरी वरील उपक्रम राबविण्यासाठी आपल्या स्तरावरून उपरोक्त संस्थेला सर्वतोपरी सहाय्य करण्यात यावे. आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना वरील उपक्रमाबाबत निर्देश देण्यात यावेत.

गोविंद नांदेडे
शिक्षण संचालक (प्राथ.)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत :
सलाम मुंबई फाऊंडेशन
निर्मल बिल्डींग, नरिमन पॉईंट, मुंबई २१
संपर्क : दिपक पाटील, मो. ९९३०६५४१३९